**ठळक बातम्या**

- देशातल्या सर्व गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी यंत्रणा विकसित करणं सुरू असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा, संयुक्त जनता दल आणि राष्ट्रीय लोक मोर्चाकडून आणखी उमेदवारांची यादी जाहीर
- अमेरिकेनं लादलेलं अतिरीक्त आयात शुल्क ही भारतासाठी फारशी चितेंची बाब नसल्याचं रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचं मत

**आणि**

- श्रीलंकेच्या प्रधानमंत्री हरिणी अमरसूर्या भारत दौऱ्यावर

**<><><><><>**

देशातल्या सर्व गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी मजबूत यंत्रणा विकसित केली जात असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. नवी दिल्लीत ते आज प्रत्यार्पण आव्हाने आणि रणनीती संबंधीच्या परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि दहशतवादाच्या विरोधात सरकारने शून्य सहिष्णुता धोरण स्वीकारलं आहे, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

**होल्ड.. बाईट-अमित शहा**

सरकारने २०१८मध्ये फरार आरोपींची मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार देणारा फरार आर्थिक गुन्हेगार कायदा आणला होता. हा कायदा लागू झाल्यानंतर पुढच्या चार वर्षांत दोन अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा रक्कम वसूल करण्यात आली आहे. मनी लॉँड्रिंग कायदेही मजबूत करण्यात आले असून त्यामुळे २०१४ ते २०२३ या दरम्यान १२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आल्याचं शहा यावेळी म्हणाले.

केंद्रीय अन्वेषण संस्थेने दोन दिवसांची ही परिषद आयोजित केली आहे. या परिषदेत विविध केंद्रीय आणि राज्य पोलीस संस्थांचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार्याच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी सहभागी होत आहेत.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आंध्रप्रदेशातील श्रीशैलम इथं श्री शिवाजी स्फुर्ती केंद्रम इथं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ध्यानस्थ मूर्तीला अभिवादन केलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी श्री शिवाजी स्फुर्ती केंद्रामधल्या शिवाजी महाराज यांच्या इतिहासाची ओळख करून देणाऱ्या शिल्प, प्रतिमा आणि मूर्तींची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्रबाबु नायडू, पवन कल्याण उपस्थित होते. त्याआधी मोदी यांनी भ्रमरंबा मल्लिकार्जून स्वामी वरला देवस्थानमला भेट दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या दौऱ्यात १३ हजार ४३० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं उद्घाटन करतील. उद्योग, ऊर्जा, रस्ते, रेल्वे, संरक्षण उत्पादन तसंच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू क्षेत्रातील हे प्रकल्प आहेत.

<><><><>

देशात मानवाधिकार हक्कांच्या संरक्षणासाठी आणि सशक्त सर्वसमावेशक चौकट उभारल्याचं माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या ३२ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कारागृहातील कैद्यांच्या हक्कांवरील राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग जगातील सर्वात महत्त्वाची आणि प्रतिष्ठित संस्था असून या संस्थेनं स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असल्याचं कोविंद यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतीय जनता पार्टी ने बिहार विधानसभा निवडणुकीसाठी १८ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. यामुळं जागा वाटपात पक्षाला मिळालेल्या सर्व १०१ जागांवरचे उमेदवार भाजपाने जाहीर केले आहेत.

**संयुक्त जनता दलानंही** बिहार विधानसभा निवडणुकीसाठीची ४४ उमेदवारांची दुसरी यादी आज जाहीर केली. नितीश कुमार सरकारमधील कॅबिनेट मंत्री लेशी सिंह, जयंत राज, सुमित कुमार सिंह आणि शीला मंडल यांना उमेदवार म्हणून पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे.

**राष्ट्रीय लोक मोर्चाने** उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. पक्षाचे अध्यक्ष उपेंद्र कुशवाह यांच्या पत्नी स्नेहलता रोहतास विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

<><><><><>

दहशतवाद, आर्थिक अस्थिरता आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी राष्ट्रांमध्ये सहकार्य वाढविण्यावर भर द्यायला हवा, असं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मोहिमेत सहकार्य करणाऱ्या सैन्यदल प्रमुखांच्या परिषदेला नवी दिल्लीत संबोधित करत होते. संरक्षणात्मक उपकरणे, सायबर क्षमता आणि सर्वोच्च दर्जाच्या मोहिमेच्या तयारीमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

ब्राझीलचे उपराष्ट्राध्यक्ष गेराल्डो अल्कमिन हे भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर असून त्यांनी आज नवी दिल्लीत उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांची

भेट घेतली. त्यानंतर आज दुपारी ते वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांच्याबरोबर द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीसंदर्भात आढावा बैठक घेतील. अल्कमिन यांच्या दौऱ्यामुळे भारत आणि ब्राझील द्विपक्षीय व्यापार भागीदारी आणि धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होण्याची अपेक्षा आहे. अलिकडेच, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ब्राझील दौरा केला होता, यावेळी व्यापार आणि गुंतवणुकीला चालना देण्यासाठी मंत्रीस्तरीय आढावा यंत्रणा स्थापन करायला आणि पुढच्या पाच वर्षांत २० अब्ज डॉलर्सच्या उलाढालीचं लक्ष्य निश्चित करण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली होती.

**<><><><><>**

अमेरिकेनं लादलेलं ५० टक्के आयात शुल्क ही भारतासाठी मोठी चिंतेची बाब नसल्याचं प्रतिपादन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी-जागतिक बँकच्या वॉशिंग्टनमधल्या बैठकीत ते बोलत होते. स्थानिक पातळीवर असलेल्या मागणीमुळं अमेरिकेनं लादलेल्या वाढीव आयात शुल्काचा परिणाम कमी होतो, असं त्यांनी सांगितलं. द्विपक्षीय व्यापार कराराच्या चर्चा करण्यासाठी भारतीय शिष्टमंडळ अमेरिकेत पोहोचलं आहे. त्यांच्याशीही मल्होत्रा यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

भारताबरोबर ऊर्जा क्षेत्रात अधिकाधिक सहकार्य करण्याची तयारी अमेरिकेनं दाखवली आहे आणि त्यासंदर्भात चर्चा सुरू असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. अमेरिकेसोबत ऊर्जा सहकार्य वाढवण्यासाठी भारत अनेक वर्षांपासून इच्छुक आहे आणि गेल्या दशकभरात त्यात प्रगती झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले.

भारतीय ग्राहकांचं हित लक्षात घेऊन देशात तेल आयात केलं जातं. स्थिर किमती आणि सुरक्षित पुरवठा ही दोन उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून भारताकडून तेलाची आयात केली जाते. त्यासाठी तेल आयातीचे अधिकाधिक पर्याय शोधणे आणि बाजारपेठेतली परिस्थिती पाहून त्यात बदल करणे हे उपाय योजले जातात, असं ते म्हणाले.

<><><><><>

भारत हा एक अतुलनीय देश असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ही चांगली व्यक्त असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. मलेशियामध्ये होणाऱ्या आसियान परिषदेच्या दरम्यान मोदी यांना भेटण्यासाठी इच्छुक असल्याचंही ट्रम्प यांनी वॉशिंग्टनमध्ये व्हाइट हाऊसमधल्या पत्रकार परिषदेत सांगितलं.

<><><><><>

श्रीलंकेच्या प्रधानमंत्री हरिणी अमरसूर्या आज तीन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी नवी दिल्लीत पोहोचल्या. त्यांचा हा पहिलाच भारत दौरा असून या भेटीमुळे दोन्ही देशांमधल्या परस्पर सहकार्याची परंपरा यापुढेही सुरू राहील आणि मैत्रीचे बंध आणखी मजबूत होतील, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या निवेदनात लिहिलं आहे. या दौऱ्यात त्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्याशी चर्चा करतील.

<><><><><>

इजिप्त परराष्ट्र मंत्री बद्र अब्देलट्टी दोन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी आज नवी दिल्लीत पोहोचले. अब्देलट्टी हे पहिल्या भारत-इजिप्त धोरणात्मक परिषदेत सहभागी होतील. ही भेट म्हणजे धोरणात्मक भागीदारीच्या अंमलबजावणीचा

आढावा घेण्याची तसंच दोन्ही देशांमधल्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी आहे, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या निवेदनात म्हटलं आहे. या दोन दिवसांच्या दौऱ्यात अब्देलट्टी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतील, तसंच, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांच्याशी चर्चा करतील.